REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १९ आक्टोबर,१९३८ अंक ४२



## किर्लोस्कर

**२५ फुटांहून खोल विहिरीसाठीं किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

**हुगळी पंप**

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा**

**सर्वांगीण प्रगति**

**सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष**

## वेस्टर्न इंडिया

**लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड**

**सातारा शहर**

१९३८ अखेर
*आठवें मूल्यमापन*
आणि
**रौप्य महोत्सव**

**त्रैवार्षिक बोनस**

**हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०**

*कोणत्याही दृष्टीनें पहा*

**वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.**

**पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.**

## अर्थाचा पुढील अंक

**दिवाळीच्या सुट्टीनिमित्त "अर्था" चा ता. २६ आक्टोबरचा अंक बंद राहील आणि त्या पुढचा अंक ता. २ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.**

# विविध माहिती

### टेलिफोनचे ग्राहक

लंडन शहराच्या टेलिफोन डिरेक्टरींत सहा लक्ष नांवें आहेत.

### विजेच्या खपावरील पट्टीचें उत्पन्न

मुंबई प्रांतांतील कांहीं विभागांमधील विजेच्या खपावर गेल्या एप्रिलमध्यें प्रत्येक युनिटास तीन पै जादा पट्टी बसविण्यांत आली, तिचें उत्पन्न चालू वर्ष अखेर पांच लक्ष रुपये येईल असा अंदाज आहे.

### जर्मनीचा मोर्चा

जर्मनीनें तुर्कस्तानास सुमारें १६ कोटि रुपयांचें कर्ज दिलें आहे. स्वतःची गैरसोय करूनहि मध्य आणि पूर्व युरोपांतील देशांचे सहायास जर्मनी जात आहे, ह्यांतील हेतु त्या देशांवर जर्मनीचा पगडा बसविणें हाच आहे. भूमध्य समुद्रांतून जाण्यायेण्याचें यापुढें कारणच उरणार नाहीं,अशी व्यवस्था करण्याची जर्मनीची योजना आहे. जर्मनी ते इराणचें आखात ह्यांमध्यें परस्पर दळणवळण सुरू झालें म्हणजे इराण, तुर्कस्तान, इराक, सिरिया, अफगाणिस्तान ह्या सर्व देशांच्या परराष्ट्रीय व्यापारांत जर्मनीस महत्त्व प्राप्त होईल.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ५ आ. १ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. १ पै इतका पडला.

### "इन्स्टिट्यूट ऑफ फिल्म टेक्नॉलॉजी"

चित्रपट–निर्मितीचें तंत्र शिकविणाऱ्या 'इन्स्टिट्यूट ऑफ फिल्म टेक्नॉलॉजी'चें उद्घाटन नागपूर येथें तेथील विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु, श्री. केदार, ह्यांनीं केलें. हिंदुस्थानांतील सिनेमाचे धंद्यांत शेकडो बेकारांची सोय लागेल असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

### ऑस्टिन कंपनीचा नफा

ऑस्टिन मोटार कंपनीस गेल्या वर्षअखेर ८० लक्ष रुपये नफा झाला. त्या पूर्वीचे वर्षी तिला १ कोटि, १४ लक्ष रुपये नफा झाला होता.

### राष्ट्रसंघाच्या सभासदांची थकबाकी

राष्ट्रसंघाच्या सभासद–राष्ट्रांपैकीं अठरा राष्ट्रांनीं १९३७ सालाबद्दलची संघाची वर्गणी वर्ष संपून गेलें तरी भरली नाहीं.

### जमशेदपूर येथील लोखंडाचा आणि पोलादाचा कारखाना

दरसाल सुमारें आठ हजार स्पेशल आगगाड्यांतून जमशेदपूर येथील टाटांच्या कारखान्यांत कच्चा माल दाखल होतो आणि तितक्याच आगगाड्यांतून पक्का माल बाहेर रवाना होतो. ह्या कारखान्यांत ३४ हजार लोक कामावर असून, त्यांस दरसाल १½ कोटि रुपये मजुरी मिळते.

### सिलोनमधील हिंदी मजूर

सिलोनमधील मळ्यांत ६¾ लक्ष हिंदी मजूर कामावर आहेत. त्यांचेमध्यें कर्जबाजारीपणाचें प्रमाण फार मोठें आहे.

### हिंदुस्थान आणि राष्ट्रसंघ

राष्ट्रसंघाच्या आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघाच्या कचेरीमध्यें हिंदी लोकांस हिंदुस्थान देशाचे वर्गणीचे मानानें नोकऱ्या मिळत नाहींत, अशी फार जुनी तक्रार आहे; तिचा पुनरुच्चार सर षण्मुखम् चेट्टी ह्यांनीं जिनिव्हा येथें नुकताच केला. वरील दोन कचेऱ्यांत मिळून दहा हिंदी नोकर आहेत. त्यांपैकीं दोघेजण तात्पुरत्या नोकरीवर असून त्यांत श्री. डी. एन. नरवणे ह्यांचें नांव आढळतें. हिंदुस्थानानें राष्ट्रसंघास गेल्या वर्षी ९ लक्ष, ९० हजार रुपये वर्गणी दिली.

### त्रावणकोर बँकेच्या प्रकरणीं कोर्टाची बेअदबी!

सध्या लिक्विडेशनमध्यें असलेल्या त्रावणकोर नॅशनल बँकेच्या एका धनकोनें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर जेम्स टेलर, बँकेच्या मद्रास येथील कचेरीचे मॅनेजर श्री. भार्गव आणि 'मद्रास मेल'चे संपादक ह्या तिघांनीं कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल मद्रास हायकोर्टाकडे अर्ज केला आहे, त्याची सुनावणी बुधवार, ता. १९ रोजीं होईल.

### वारसावरील कर

ग्रेट ब्रिटनमधील वारसावरील करामुळें इस्टेटीचा केवढा मोठा हिस्सा सरकारी तिजोरींत जातो, हें लॉर्ड ब्राडनलो ह्यांच्या मालमत्तेच्या उदाहरणावरून लक्षांत येईल. लॉर्ड साहेबांच्या वडिलांस १९२१ सालीं १ कोटि, ८२ लक्ष रुपयांची इस्टेट मिळाली. त्यापैकीं शेकडा ४३ इतकी रकम वारसावरील कराचे स्वरूपांत त्यांस सरकारांत भरावी लागली. सध्याचे लॉर्डसाहेब १९२७ सालीं गादीवर आले तेव्हां त्यांच्या मालमत्तेच्या शेकडा २९ इतक्या भागास ते मुकले. म्हणजे, सहा वर्षांचे अवधींत त्यांचे घराण्यानें १ कोटि, ११ लक्ष इतका वारसावरील कर दिला आणि ७१ लक्ष रुपयांची मालमत्ता त्यांचेकडे शिलक राहिली.

### ॲबिसिनियावर इटलीचें वर्चस्व—ग्रेट ब्रिटनचें अंग!

"ग्रेट ब्रिटनच्या मदतीविना इटलीचें ॲबिसिनियावर प्रभुत्व टिकणें अशक्य आहे; ग्रेट ब्रिटननें इटलीस ॲबिसिनियांत प्रवेश मिळवून देण्यास सहाय केलें हें निर्विवाद आहे" असे "मँचेस्टर गार्डियन" ह्या एका ब्रिटिश वृत्तपत्राचे ॲबिसिनियांतील माजी प्रतिनिधि, मि. गॅरट, ह्यांनीं एका भाषणांत उद्गार काढले.

### हिंदुस्थान सरकारचे परदेशांतील व्यापारी प्रतिनिधी

हिंदुस्थान सरकारनें हिंदी मालाचा प्रचार करण्याकरितां लंडन, हॅंबूर्ग, मिलन, न्यूयॉर्क, जपान, मोंबासा आणि काबूल येथें व्यापारी प्रतिनिधी नेमले आहेत. लंडन येथील प्रतिनिधीच्या खर्चाचे वार्षिक बजेटांत १ लक्ष, ८१ हजार रुपयांची तरतूद आहे. इतर कोणत्याहि प्रतिनिधीच्या वाट्यास ह्याचे निम्म्या इतकीहि रकम येत नाहीं.

### लोकसंख्येच्या वाढीस उत्तेजन

इटलीमध्यें नूतन अर्भकाचा जन्म मित्रमंडळींस आणि आप्तेष्टांस कळविण्याचा असल्यास त्याबद्दल करावयाच्या तारेस पैसे पडत नाहींत.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २–१०–३८ ते ८–१०–३८ | ५६,५२,३३७ |
| ९–१०–३८ ते १५–१०–३८ | १९,१६,७१९ |
| २१–९–३१ ते १५–१०–३८ | ३,२०,९५,०६,८४८ |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५०६ |
| २ मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगति ... | ५०७ |
| ३ व्यापारी वाटाघाटी फिसकटल्या; पुढें काय ! | ५०८ |
| ४ प्रत्येकास ८० रुपये पेन्शन | ५०८ |
| ५ स्फुट विचार ... | ५०९ |
| यंदाची अतिवृष्टी—प्रश्न सुटला नाहीं, अधिक अवघड झाला—वऱ्हाडांतील सहकारी जिल्हा बँका—त्यांच्या परिस्थितीची चौकशी— | |
| ६ सहकारी चळवळ | ५११ |
| ७ शेती सुधारणा ... ... | ५१२ |
| ८ वापरलेल्या मोटारींचा व्यापार | ५१३ |
| ९ गिरणी कामगारांस नफ्यामध्यें वाटा. ... ... | ५१४ |
| १० दुभाष्याची आवश्यकता | ५१४ |
| ११ निवडक बाजारभाव | ५१५ |

अर्थ

बुधवार, ता. १९ आक्टोबर, १९३८

## मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगति

मुंबई प्रांतांतील सहकारी सोसायट्यांबाबतचा १९३६-३७साल-विषयक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत दिलेल्या माहितीवरून ह्या प्रांतांतील सहकारी चळवळ प्रगतिपथावर असल्याचें आढळून येतें. आर्थिक मंदीस प्रारंभ झाल्यापासून शेतकऱ्यांची परिस्थिति खालावत चालली, त्याबरोबरच सहकारी सोसायट्यांसहि दुरावस्था प्राप्त होत गेली आणि थकबाकीचें प्रमाण वाढत गेलें. शेतकऱ्यांची उन्नति घडवून आणण्यास पायाशुद्ध सहकारी चळवळीइतकें उपयोगी साधन दुसरें नाहीं, असा अभिप्राय रिझर्व्ह बँकेनें व्यक्त केला आणि मुंबई सरकारनें नेमलेल्या मेथा-भणसाळी कमिटीनें मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या व्यवस्थेंत महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या, तेव्हांपासून ह्या प्रश्नानें जनतेचें लक्ष वेधलें आहे. शेतकऱ्यांच्या दुःस्थितीबद्दल सरकारास कितीहि सहानुभूति वाटत असली तरी मुद्दाम, जाणून बुजून, कर्जफेड न करणाऱ्या पतपेढ्यांच्या सभासदांविरुद्ध जालीम उपाय योजना करण्यास तें माघार घेणार नाहीं, आणि सहकारी चळवळींतून अनिष्ट लोकांची हकालपट्टी केल्याखेरीज चळवळीची प्रगति होणार नाहीं असें आपलें धोरण मुंबई सरकारनें जाहीर केल्यामुळें ह्या बाबतची गैरसमजूत दूर झाली आणि सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेसंबंधीं चर्चा ऐकूं येऊं लागली. ह्या संबंधांतील सर चुनीलाल मेहता ह्यांचे विचार ‘ अर्था ’ मध्यें नुकतेच प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

अहवालाचे वर्षीं शेतीविषयक आणि आर्थिक परिस्थिति असमाधानकारक असतांहि नवीन सोसायट्यांचे संख्येंत वाढ झालेली आढळून येते. शेतकऱ्यांस सावकारांकडून पूर्वीप्रमाणें कर्जे मिळणें कठीण झालें आहे, हें त्या वाढीचें कारण असावें, असें रिपोर्टांत सूचित केलें आहे. १९३५-३६ अखेर मुंबई प्रांतामध्यें ४,८४७ सोसायट्या चालू होत्या; १९३६-३७ अखेर त्यांचेमध्यें २२३ सोसायट्यांची भर पडली. सभासदांची संख्याहि ५ लक्ष, ५१ हजारांची ५ लक्ष, ८७ हजार झाली. त्याचप्रमाणें सोसायट्यांचें खेळतें भांडवलहि ४० लक्ष रुपयांनीं वाढलें आणि थकबाकी १५ लक्ष रुपयांनीं कमी झाली. रिपोर्टाचे वर्षांत एकूण १२६ शेतकी पतपेढ्या नोंदण्यांत आल्या, त्यांपैकीं ६१ सोसायट्या मध्यविभागांतील आहेत. शेतकी पतपेढ्यांच्या संख्येंत समाधानकारक वाढ झाली, तरी त्यांच्या सभासदांची संख्या त्या मानानें न वाढतां उलट तीमध्यें घटच पडलेली आढळते. १९३६-३७ चे प्रारंभीं शेतकी पतपेढ्यांकडे सभासदांचे २ कोटि, ४७¾ लक्ष रुपये येणें होते; ह्या वर्षीं ७८½ लक्ष रुपयांचें नवीन कर्ज देण्यांत आलें. एकूण येण्यापैकीं शेकडा ५२ इतकी रकम वसूल झाली नाहीं. १९३५-३६ सालीं थकबाकीचें प्रमाण शेकडा ६० इतकें होतें; म्हणजे ह्या बाबतींत थोडी सुधारणा झाल्याचें दिसून येतें सबंद प्रांतांत मिळून १ कोटि, २८½ लक्ष रुपयांची बाकी थकलेली आहे. ‘ अ ’ आणि ‘ ब ’ वर्गांतील सोसायट्यांची संख्या वाढली असून ‘ क ’ वर्गांतील सोसायट्यांची संख्या कमी झाली आहे परंतु ‘ ड ’ वर्गांतील सोसायट्यांत वाढ झाली आहे. ‘ ड ’ वर्गांत तीन वर्षांपेक्षा अधिक काळ असणाऱ्या सोसायट्या गुंडाळून टाकण्यांत याव्या, अशी सूचना असिस्टंट रजिस्ट्रारांस करण्यांत आली आहे. वाईट सोसायट्यांची सुधारणा घडवून कशी आणावी, ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेनें आपल्या रिपोर्टांत सूचना केल्या आहेत. थकबाकी कमी करण्यासाठी शक्य तेथें लँड मॉर्गेज बँकांकडून कर्ज घेण्यांत यावें आणि जरूर वाटल्यास ती बाकी लिहून टाकून कर्जाची रकम कर्जदाराचे आवाक्यांत आणून ठेवावी, असा तिनें सल्ला दिला आहे. हें घडवून आणण्यास कर्जे देणाऱ्या बँकांचें सहकार्य आवश्यक आहे, हें उघड आहे. ह्या बाबतींत मुंबई प्रांतांतील सहकारी खातें शक्य ते यत्न करीत आहे. अहवालाचे वर्षीं “ सवलतीच्या योजने ”चा ८७४ सोसायट्यांनीं फायदा घेतला आणि त्यांनीं २ लक्ष, ५½ हजार रुपये सवलत मिळवली. आतां, व्याजाच्या दरांतील सवलत कायम करण्यांत यावी, अशी मागणी करण्यांत आली असून, तिला अनुसरून शक्य तेथें व्याजाचे दर उतरविलेले आहेत.

सेंट्रल बँकांस कमी व्याजानें भरपूर ठेवी मिळत असतांनाहि, ह्या स्वल्प व्याजाच्या दराचा फायदा शेतकऱ्यांस मिळत नाहीं, अशी तक्रार कित्येक वेळां ऐकूं येते, तिला अहवालामध्यें योग्य उत्तर देण्यांत आलें आहे. सोसायट्यांच्या व्याजाचा दर त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहणें स्वाभाविक आहे. “ मुद्दल आणि व्याज ह्यांची वसुली वक्तशीर झाली नाहीं, तरी सोसायटीच्या घेणेकऱ्याचें देणें भागवावें लागतें आणि त्यामुळें व्याजाचा दर कमी ठेवतां येत नाहीं. सोसायट्यांनीं वसुली नीट केली आणि व्यवस्थेचा व इतर खर्च कमी करून काटकसर दाखविली, तर व्याज कमी करतां येणें शक्य होईल.” असा सल्ला रजिस्ट्रारनीं आपल्या रिपोर्टांत दिला आहे. केवळ मामुली कोष्टकें देऊन संतुष्ट न रहातां, रजिस्ट्रारनीं आपल्या अहवालांत सहकारी चळवळीसंबंधीं मार्गदर्शक सूचना केल्या असून सुधारणेचे मार्ग दाखविण्याचा यत्न केला आहे, हें प्रस्तुत अहवालाचें एक वैशिष्ट्य सांगतां येईल. गेल्या कांहीं वर्षांच्या अहवालांचे मानानें हा अहवाल आशाजनक आहे, ह्यांत संशय नाहीं.

## व्यापारी वाटाघाटी फिसकटल्या, पुढें काय ?

### हिंदी सल्लागार मंडळाचा रिपोर्ट

हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांमधील परस्पर व्यापारासंबंधीं वाटाघाटी दीर्घ काळ चालून अखेर ह्या फिसकटल्या असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. बिनसरकारी हिंदी सल्लागारांमध्यें मतभेद होऊन त्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे दोन स्वतंत्र रिपोर्ट पाठविले. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, पार्लकिमेडीचे महाराज, मि. लियाकत अलिखान, श्री. जी. डी. बिर्ला आणि श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांचा एक स्वतंत्र रिपोर्ट गेला असून सर एडवर्ड बेंथॉल आणि सरदार दातारसिंह ह्यांनींहि आपलें म्हणणें वेगळें कळवलें आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, श्री. बिर्ला आणि श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांस ब्रिटिश बाजूचें म्हणणें पटणार नाहीं, ह्याविषयीं पहिल्यापासूनच शंका नव्हती; परंतु ओरिसाचे एक प्रमुख जमीनदार आणि मुस्लिम लीगचे जनरल सेक्रेटरी हे दोघे त्यांस मिळाले, ह्याबद्दल ब्रिटिश हितसंबंधी लोकांस आश्चर्य वाटत आहे. वरील दोन्हीं रिपोर्टांचा हिंदुस्थान सरकार तूर्त विचार करीत आहे. हे रिपोर्ट आणि त्यांवरील हिंदुस्थान सरकारचें म्हणणें ब्रिटिश सरकाराकडे पाठविण्यांत येणार असल्याचें समजतें.

### अनुकूल सल्ला देणाऱ्या टारिफ बोर्डाची नेमणूक ?

लँकेशायरच्या मालावर हिंदुस्थान सरकारनें १२½% पेक्षा अधिक जकात बसवूं नये आणि हिंदुस्थानानें दरसाल कमींत कमी ३५ कोटि वार कापड लँकेशायरकडून घ्यावें अशी अखेरची तडजोडीची सूचना ब्रिटिश सरकारनें केली होती. चालू वर्षी लँकेशायरच्या कापडाची जेवढी आयात अपेक्षित आहे, त्याचे मानानें वरील आकडा शेकडा पन्नासानीं मोठा आहे. हिंदी सल्लागार मंडळांतील बहुसंख्य सभासदांस २५ कोटि वारांपेक्षा अधिक ब्रिटिश कापडाची आयात नको आहे आणि जकातीचा दर १५ टक्क्यांखालीं आणण्यास त्यांची तयारी नाहीं. अशा परिस्थितींतून मार्ग कसा निघणार ह्याची कल्पना ब्रिटिश वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांवरून येते. हिंदी कपास कापडाच्या धंद्याची चौकशी करण्याकरितां लवकरच टारिफ बोर्डाची नेमणूक करण्यांत येईल आणि देशी कापडाचे उत्पादनावर एक्साइज पट्टी बसविण्यास आणि संरक्षित धंद्यांच्या नफ्यावर ' एक्सेस प्रॉफिट ड्यूटी ' आकारण्यास अनुकूल असणाऱ्या गृहस्थांची त्या बोर्डावर नेमणूक होईल, असें म्हणतात. तज्ज्ञांच्या ह्या बोर्डाचे सल्ल्यानुसार चालण्यास हिंदुस्थान सरकारास अर्थातच सोईचें पडेल.

### अनिश्चित वातावरण

प्रांतिक सरकार हातमागांचे धंद्याकडे विशेष लक्ष पुरवीत आहे आणि ह्या धंद्याची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होईल अशी अपेक्षा आहे. गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडास त्या मानानें कमी मागणी येईल हें उघड आहे. कामगारांबाबत कायदे, मजुरीच्या दरांत घडवून आणलेली सुधारणा, इत्यादि गोष्टींमुळें हिंदी कपास कापडाच्या गिरण्यांच्या उत्पादनाचे किंमतींत शेकडा पांच इतकी तरी वाढ झाली असली पाहिजे. चीन जपान युद्धामुळें हिंदी कापडाच्या निर्गतीस चालना मिळाली होती, ती तात्पुरतीच ठरली, असें दिसतें. इजिप्त, ब्रह्मदेश इत्यादि देशांनीं हिंदी कापडाची आयात कमी केली आहे. अहमदाबाद येथील गिरण्यांच्या मालाचा उठाव गतसालाप्रमाणेंच होत असला तरी नफ्याचें प्रमाण उतरलें असलें पाहिजे. कपाशीच्या बाजारभावांत जोपर्यंत सुधारणा होत नाहीं, तोपर्यंत कपास पेरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांचे हाल टळणें शक्य नाहीं. इकडे, हिंदी कापडाच्या गिरण्यांनीं मात्र इजिप्शन कपाशीची आयात चालू ठेवली आहे ! ह्यासंबंधांत कांहींतरी उपाययोजना केली जाईल, असें वरील ब्रिटिश पत्रानें ध्वनित केलें आहे. हिंदी सल्लागार मंडळापैकीं पांच सभासदांचा रिपोर्ट बाजूस सारणें हिंदुस्थान सरकारास सोपें जाणार नाहीं, तेव्हां ह्या बिकट परिस्थितींतून बाहेर पडण्यास कोणती युक्ति योजली जाते, तें पहावें. हिंदी मागण्या दूर सारून ब्रिटिश हिताची जोपासना केल्याचा आपणांवर आरोप येऊं नये, ह्या दृष्टीनें सरकारास कांहीं तरी धोरण आखावें लागेल. कपास कापडाच्या उत्पादनासंबंधीं चौकशी करणाऱ्या टारिफ बोर्डावर 'विश्वासू' लोकांची नेमणूक होण्याचा संभव ब्रिटिश वर्तमानपत्रांतच सूचित करण्यांत आलेला असल्याचें वर सांगितलेंच आहे. मध्यवर्ती असेंब्लीपुढें योजना मांडतांना, हिंदुस्थान सरकारास टारिफ बोर्डाचा दाखला देतां आला, म्हणजे असेंब्लीनें सरकारचें म्हणणें फेटाळून लावलें तरी टारिफ बोर्डासारख्या तज्ज्ञांच्या कमिटीचा सल्ला स्वीकारून त्याप्रमाणें योजना करण्यास सरकारास अवघड वाटणार नाहीं.

## प्रत्येकास ८० रुपये पेन्शन

### " आल्बर्टा " प्रयोगाची दुसरी आवृत्ती

अमेरिकेंतील आल्बर्टा संस्थानामधील उपक्रमाचा विसर पडण्यापूर्वीच त्या देशांतील दुसऱ्या एका संस्थानामध्यें-कॅलिफोर्नियामध्यें-लोकांस श्रीमंत करणाऱ्या एका योजनेचा पुरस्कार झाला आहे. तेथील एका निवडणुकींत मि. डौने ह्या गृहस्थानें ह्या योजनेच्या पुरस्काराचे बळावर नुकतेंच यश संपादन केलें आहे. पन्नास वर्षांवरील प्रत्येक नागरिकास प्रांतिक सरकारनें दर आठवड्यास वीस रुपये पेन्शन द्यावें आणि ह्या पेन्शनाची हमी घेणारे कागद चलनी नोटांप्रमाणें व्यवहारांत चालावे अशी त्याची मागणी आहे. ह्या नोटा फक्त सात दिवसच कायदेशीर व्हाव्यात; त्यानंतर आणखी एक आठवडा त्या चालवावयाच्या असल्यास त्यांवर शेकडा दोन इतक्या किंमतचीं तिकिटें डकविलीं पाहिजेत आणि हीं तिकिटें मात्र अमेरिकन चलनाच्या विनिमयांत खरेदी केलीं असलीं पाहिजेत, असा सदरहु योजनेचा तपशील आहे. वर्षअखेर ह्या नोटा रद्द केल्या जातील. म्हणजे, चलनावर प्रत्येक आठवड्यास दोन टक्के कर बसवून त्यांतून पेन्शनें दिलीं जातील, असा अर्थ झाला. ही योजना कॅलिफोर्नियानें अंमलांत आणली, तर त्यास दरसाल कोट्यवधि रुपये खर्च येईल. प्रत्येक मनुष्य आपल्या जवळील नोटा खर्चून टाकून,तिकिटें चिकटवावीं लागूं नयेत असा यत्न करील हें उघड आहे. ह्या खर्चामुळें लोकांस समृद्धि प्राप्त होईल, अशी मि. डौने ह्यांची कल्पना आहे. अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांस, अर्थातच, ही योजना नापसंत आहे आणि ती अंमलांत आल्यास कॅलिफोर्नियाचें दिवाळें वाजेल असें ते म्हणतात. मातीचें सोनें करण्याच्या किमयांप्रमाणें अनेक तऱ्हेच्या चलनविषयक सुधारणा आजपर्यंत सुचविण्यांत आल्या, त्या सर्व मातीमोल ठरल्या. अमेरिकेंत सध्या असल्या योजनांस पीक आलें आहे.

## स्फुट विचार

### यंदाची अतिवृष्टी

यंदा महाराष्ट्रांत पावसानें एका पंधरवड्यांत अशी कांहीं अपूर्व झोड उठवून दिली कीं लोकांस नको असें होऊन गेलें. बहुतेक ठिकाणीं अगोदरच पाऊस चांगला झाला आणि मेघराजाचा खजिना रिता होऊन ऐन वेळीं पुढें पिकांस पाण्याचा तुटवडा पडतो कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. ज्या जिल्ह्यांत पहिले पाऊस फारसे होत नाहींत, तेथेंहि त्यांनीं चंगळ उडवून दिली. अहमदनगर, सोलापूर, पुणें, रत्नागिरी इत्यादि जिल्ह्यांत पावसाच्या नेहमींच्या सरासरीपेक्षा किती तरी अधिक पाऊस झालेला असून तो अवेळीं आणि जरूरीच्या मानानें ज्यास्त पडल्यामुळें बाजरीचें पीक बहुतेक गेलें आणि भाताचें विलक्षण नुकसान झालें आहे. ह्या अतिवृष्टीचा अनिष्ट परिणाम कपास आणि भुइमूग ह्या पिकांसहि भोवला आहे. पाऊस जोराचा आणि सतत झाल्याकारणानें अनेक ठिकाणीं जमिनी वाहून गेल्या असून त्यांची उत्पादकशक्ती मर्यादित झाली आहे. एकंदरीनें पहातां, यंदाच्या अतिवृष्टीची आपत्ती महाराष्ट्रास जाचक झाली आहे ह्यांत शंका नाहीं. शेतकरीवर्ग अगोदरच आर्थिक मंदीनें त्रस्त झालेला आहे आणि त्यांतच अतिवृष्टीच्या हानीची भर पडली आहे. बाजारभाव चढले नाहींत तरी निदान पिकें भरपूर येतील अशी वाटत असलेली आशा नष्ट झाली आहे. त्या आपत्तीची चौकशी करून शेतकरीवर्गास जरूर तें सहाय देण्याची व्यवस्था सरकारास करावी लागेल. अतिवृष्टीमुळें शहरवासीयांचेंहि नुकसान चोहोंकडे झालें आहे. रस्ते खराब होऊन कित्येक ठिकाणीं घरांची नादुरुस्ती झाली आहे. स्थानिक संस्था आणि नागरिक ह्यांस यंदाचा पाऊस चांगला जाणवला आहे.

### प्रश्न सुटला नाहीं, अधिक अवघड झाला

इंग्लंड आणि फ्रान्स ह्या राष्ट्रांनीं झेकोस्लोव्हेकियास जर्मनीच्या मागण्या मान्य करण्यास लावल्यामुळें युरोपांतली युद्धाची आपत्ति तात्पुरती टळली. परंतु ह्या व्यवस्थेच्या पायावर शांततेची नवी सृष्टी स्थापणें आपण शक्य केलें आहे ही मि. चेंबर्लेन ह्यांची घोषणा खरी ठरण्याचा रंग दिसत नाहीं. एक तर हंगेरी आणि पोलंड ह्यांनीं जर्मनीप्रमाणेंच झेकोस्लोव्हेकियाचे लचके तोडण्यास प्रारंभ केला असून त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य ह्या हतभागी देशांत नाहीं. आपल्या मध्यस्थीनें ब्रिटिश आणि फ्रेंच मुत्सद्यांनीं झेकोस्लोव्हेकिअन प्रश्न सोडविण्यास सहाय केलें ह्याविषयीं त्या राष्ट्रांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचें तर बाजूलाच राहिलें, पण हेर हिटलर उलट त्यांस दम भरीत आहे. त्या मुत्सद्यांनीं आपल्या घरांतली व्यवस्था पहावी, जर्मनीच्या अंतर्गत प्रश्नांत तोंड घालूं नये, असें त्यानें त्यांस निक्षून सांगितलें आहे. मध्य युरोपांत आपलें आर्थिक साम्राज्य स्थापून त्याचे धागेदोरे तुर्कस्तानापर्यंत पोंचवण्याची जर्मनीची कारवाई उघड उघड चालू आहे. तुर्कस्तानास भलें मोठें कर्ज देऊन तेथें आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याची जर्मनीची योजना प्रसिद्ध झाली आहे. बाल्कन राष्ट्रें जर्मनीच्या जाळ्यांत अडकलीं म्हणजे पूर्वेकडचा त्याचा मार्ग मोकळा होणार असून हें प्रस्थ इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांस डोईजड झाल्यावांचून रहाणार नाहीं. युद्ध टळल्याकारणानें स्वस्थ बसण्याचे ऐवजी इंग्लंडनें स्वसंरक्षणाची आणि युद्धसामुग्रीची तयारी जोरानें चालवली आहे ह्यावरून भावी जर्मन संकटाची त्या राष्ट्रास चांगली कल्पना आहे हें उघड दिसतें. "शांतता हवी असेल तर युद्धाची तयारी ठेवा" हें राजनीतीचें जुनें तत्त्वच सध्याच्या काळीं प्रभावी ठरत आहे. युद्धाची भीति कायम राहिली आणि शस्त्रास्त्रांवरचा अवाढव्य खर्च सारखा होत राहिला तर आंतरराष्ट्रीय आर्थिक स्वास्थ्य स्थापन करण्याची पाश्चात्य मुत्सद्यांची भाषा व्यर्थ झाली आहे हें स्पष्ट आहे.

### वऱ्हाडांतील सहकारी जिल्हा बँका

उतरलेले बाजारभाव आणि पाऊसपाण्याची टंचाई ह्यांचे परिणाम गेल्या आठ वर्षांत सर्व सहकारी शेतकी पेढ्या आणि मध्यवर्ती बँका ह्यांस भोगावे लागले आहेत. एखाद दुसरें वर्ष वाईट गेलें तर ह्या संकटांतून पार पडण्याइतकी अंगची शक्ती सहकारी संस्थांत स्वाभाविकच असते. परंतु मंदीची आपत्ति वर्षानुवर्ष चालू राहिल्यास सहकारी संस्थांचें भांडवल गोठून जातें आणि त्यांचे व्यवहार बंद पडण्याची पाळी येते. बाजारभाव चांगले असतांना ज्यांनीं मोठ्या प्रमाणांत कर्जें दिलीं अशा पेढ्या आणि बँका ह्यांची स्थिति प्रदीर्घ आर्थिक मंदीच्या काळांत विशेष हलाखीची होते. पुणें जिल्ह्यांतील बारामतीच्या भागांतील कॅनॉल खालच्या पतपेढ्यांची अवस्था ह्या प्रकारची झाली असून प्रांतिक बँकेचा पैसा त्यांमध्यें अडकून पडला आहे, हें प्रस्तुत परिस्थितीचें ठळक उदाहरण आहे. मध्यप्रांतांत वऱ्हाडच्या जिल्ह्यांमध्यें पेढ्या आणि बँका ह्यांचेवर कपाशीच्या उतरलेल्या बाजारभावाचे दुष्परिणाम फार जाचक असे झाले असून ह्या आपत्तींमधून त्यांस कसें बाहेर काढावें हा प्रश्न तेथील सहकारी कार्यकर्ते आणि सरकार ह्यांचे पुढें आहे. सभासदांचीं कर्जें वसूल होऊं न शकल्यानें पतपेढ्यांस त्यांच्या जमिनींचे लिलांव करावे लागले आणि त्यांपैकीं अनेक त्यांच्या अंगावर पडल्या. ज्या जिल्हा बँकांनीं पेढ्यांस कर्जें दिलीं होतीं, त्यांस कर्जफेडींत ह्या जमिनी घ्याव्या लागल्या. ठेवींच्या स्वरूपांत जनतेकडून बँकांनीं पैसे घेतलेले असतात, ते ह्या रीतीनें जमिनींत अडकून पडले आणि त्यांचा मुख्य व्यवहार जो पतपेढ्यांस कर्जाऊ रकमा देणें, तो बहुतांशीं बंद पडला. पेढ्या आणि बँका ह्यांस स्वतःच्या मालकीच्या जमिनी नको असतात; त्यांस आपला पैसा तरता ठेवावयाचा असतो. वऱ्हाडमधील अनेक सहकारी बँकांत परिस्थिति विपरीत होऊन गेली आणि तीमधून मार्ग कसा काढावा हा पेंचप्रसंग तेथें निर्माण झाला.

### त्यांच्या परिस्थितिची चौकशी

वऱ्हाडांतील सहकारी बँकांची वर वर्णिलेली स्थिति थोडी-फार चिंताजनक होती, ह्यांत संशय नाहीं. ती सुधारण्याचें काम सहकारी बँका आणि कार्यकर्ते ह्यांच्या आवाक्याच्या बाहेर गेलें असून सरकारनें त्यांस सहाय देण्याची निकडीची आवश्यकता भासत होती. मध्यप्रांतांतील सरकारनें ही गोष्ट लक्षांत घेऊन परिस्थितीची चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे. हिंदुस्थानांतील खेडेगांवीं जनतेची स्थिति सुधारण्यास सहकारी संघटनासारखा दुसरा कार्यक्षम उपाय नाहीं, असा आपला विश्वास सरकारनें व्यक्त केला आहे हें अभिनंदनीय आहे. सहकाराचें तत्त्व आणि सहकारी संस्थांची उपयुक्तता ह्यांचें यथातथ्य ज्ञान नसलेल्या लोकांमध्यें त्यांचे संबंधानें गैरसमज पसरलेले आढळतात. त्यांस मध्यप्रांतीय सरकारनें ह्या घोषणेनें व्यवस्थित

उत्तर दिलें आहे हें समाधानकारक आहे. चौकशीचें काम तातडीनें व्हावें म्हणजे कमिटीनें केलेल्या शिफारसींची विल्हेवाट त्वरेनें होऊं शकेल असेंहि त्या सरकारनें म्हटलें आहे. ह्या आश्वासनाचे योगानें जनतेची सहकारी संस्थांच्या स्थितीविषयींची साशंक वृत्ति निवळेल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. जिल्हा बँकांची सांपत्तिक परिस्थिति, त्यांच्या ताब्यांत आलेल्या जमीनींचा किफायतशीर उपयोग, ज्यांस व्यवहार चालू ठेवण्यास पैशाची आवश्यकता आहे अशा बँकांस भांडवल मिळण्याचे मार्ग इत्यादि बाबींचा विचार कमिटीनें मुख्यत्वेंकरून करावयाचा आहे. कमिटीचे सभासद अनुभवी सहकारी आणि जबाबदार नागरिक असल्यानें तिच्या सूचना व्यावहारिक दृष्ट्या उपयुक्त अशा होतील, ह्यांत शंका नाहीं. वऱ्हाडांतील जिल्हा बँकांच्या दुःस्थितीचें घोंगडें भिजत पडलें आहे, त्या प्रकरणाचा तातडीनें विचार करण्याचें मध्यप्रांतीय सरकारनें ठरवल्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

---

### " शेती आणि शेतकरी "

वरील मासिकाचा ऑक्टोबर, १९३८ चा अंक प्रसिद्ध झाला आहे.त्यांत ग्रामसुधारणा—शेतकरी बांधवांशीं हितगुज, उसावरील टोळ आणि त्यांवर उपाय, विश्वेश्वर अय्या कमिटीचा रिपोर्ट, मुंबई शेतकी खात्याच्या कामाचा अहवाल, फळांचे टिकाऊ पदार्थ, इत्यादि विषयांवर लेख आले आहेत.

---

### सुडेटेन विभागांत जर्मनीचा प्रचार

झेकोस्लोव्हेकियाच्या सुडेटेन विभागांत जर्मनीनें गेलें सबंद वर्ष आपल्यातर्फे प्रचार चालू ठेवला होता. चांगल्या कागदावर छापलेलीं स्वस्त नकाशा पुस्तकें जर्मनीनें तेथें वाटलीं. ह्या पुस्तकांतील एका नकाशामध्यें १९१८ पूर्वीच्या जर्मनीची सरहद्द दाखवण्यांत आली होती तिचे आंत सुडेटेन विभागाचाहि समावेश करण्यांत आला होता. वास्तविक, सुडेटेन प्रांत जर्मनीचे अधिकाराखाली कधींच नव्हता; ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्यांत तो अंतर्भूत होता. पुस्तकाच्या दुसऱ्या एका पृष्ठावर जर्मनी आणि झेकोस्लोव्हेकिया ह्यांमधील खनिज संपत्तीची तुलना करण्यांत आली होती आणि जर्मन प्रदेश संपन्न असून झेक मुलूख नापीक आणि भिकार असल्याचें दर्शविलें होतें.

### इंडो-जर्मन असोसिएशन

जर्मनी आणि हिंदुस्थान ह्यांमधील व्यापाराचें संवर्धन करण्याकरितां मुंबई येथें 'इंडो-जर्मन असोसिएशन'ची लवकरच स्थापना होणार आहे.

### राष्ट्राच्या बचावाकरितां तरतूद

ग्रेट ब्रिटनचा युद्धप्रसंगीं बचाव करण्याकरितां नागरिकांचीं पथकें तयार ठेवण्यासाठी स्वतंत्र खातें निर्माण करून तें एका नवीन मंत्र्याचे हातीं देण्यांत येईल असें समजतें. बंगालचे माजी गव्हर्नर, सर जॉन अँडरसन, ह्यांची त्या जागेवर नेमणूक होण्याचा संभव आहे. प्रत्येक कुटुंबांतील लोकांनीं आपण राष्ट्रासाठी काय करूं शकूं, ह्याचा तपशील द्यावयाचा आणि जरूरीप्रमाणें योग्य त्या नागरिकांस सरकारी बोलावणें यावयाचें, अशी योजना आखण्याचें काम हें नवीन खातें करील.

### बँकांस सुट्टी

शनिवार आणि सोमवार, ता. २२ व २४ ऑक्टोबर रोजीं दिवाळीनिमित्त बँका बंद रहातील.


## ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

---

**स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन**

त्याचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी

## लिमिटेड, पुणें.

**ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.**

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर

बी. ए., एलएल. बी.

मॅनेजिंग एजंट.

---

## दि प्रॉव्हिन्शिअल बँक

### ऑफ अिण्डिया लिमिटेड

**स्थापना १९३६**

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगळूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: **अेस्. पी. ठाकर.**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्**: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्**: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी**: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

**एम्. मोहन, एजंट,** १७ मेनस्ट्रीट, पुणें.

**एच. जी. गद्रे, एजंट,** लक्ष्मीरोड, पुणें. २

# सहकारी चळवळ

## मुंबई प्रांतांतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगति (१९३६-३७)

मुंबई प्रांतांतील जिल्हा बँकांच्या भाग भांडवलांत, रिझर्व्ह आणि इतर फंडांत व खेळत्या भांडवलांत बरीच वाढ झालेली आढळते. ठेवींवरील व्याजाचे दर उतरविले, तरी बँकांकडील ठेवींचे रकमेंत विशेष घट झाली नाहीं. थकबाकीचे रकमेंत थोडी सुधारणा दिसून येते. बँकांच्या नफ्यांत ८६ हजारांची वाढ झाली. "सोसायट्यांस आकारण्यांत येणाऱ्या व्याजाचे दरांत उतार करतां येणें शक्य आहे," असें अनुमान वरील आकड्यांवरून रजिस्ट्रारनीं आपल्या अहवालांत काढलें आहे. बँकांस ज्या दरानें ठेवी मिळतात, त्याचेपेक्षां ज्यास्तींत ज्यास्त ३ टक्के दरानें सोसायट्यांकडून व्याज घेण्यांत यावें, असें त्यांनीं सुचविलें आहे. सेंट्रल बँकांच्या प्रगतीविषयीं माहिती खालील कोष्टकांत दिली आहे:—

| | १९३५–३६ | १९३६–३७ |
|---|---|---|
| १ जिल्हा सेंट्रल बँकांची संख्या | १३ | १२ |
| २ सभासद | | |
| (अ) व्यक्ति | ७,८०१ | ८,४२१ |
| (ब) सोसायट्या व बँका | २,८७१ | २,९४९ |
| | रुपये | रुपये |
| ३ भरणा झालेलें भांडवल | २६,६६,८५० | २७,१६,९६० |
| ४ रिझर्व्ह आणि इतर फंड | १६,६४,९५६ | १८,९२,०१६ |
| ५ खेळतें भांडवल | ३,००,७९,१४२ | ३,०६,५२,९५० |
| ६ ठेवी | | |
| (अ) व्यक्तींकडून | २,२६,७३,३२९ | २,२४,९५,०५४ |
| (ब) सोसायट्यांकडून | २८,००,६१२ | ३२,२४,०२८ |
| ७ सोसायट्यांकडून येणीं | १,०६,९९,३५७ | १,०८,९१,५८० |
| ८ थकबाकी | | |
| (अ) अधिकृत | १२,१४,८३१ | १८,२९,९७० |
| (ब) अनधिकृत | ४४,३२,०८१ | ३६,१७,१७३ |
| ९ अनधिकृत थकबाकीचें एकूण कर्जाशीं प्रमाण | ४१% | ३३% |
| १० नफा | ३,८७,२४१ | ४,७३,६५६ |
| ११ व्यवस्थेचा खर्च | ३,४४,१२५ | ३,५३,८६१ |
| १२ खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण | १·१% | १·१% |

### डेक्कन मर्चंट्स् को. बँक लि. मुंबई

वरील बँकेचें भाग भांडवल ४७,६५५ रुपये असून गंगाजळी आणि इतर फंडांत मिळून २७¼ हजार रुपये आहेत. तिचेकडे ४¾ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सरकारी रोख्यांत १२½ हजार रुपये गुंतविले असून सभासदांकडे तिचें येणें २ लक्ष, २६½ हजार रु. आहे. तिनें ४५ हजारांचे ओव्हरड्राफ्ट दिलेले आहेत. थकबाकीचें प्रमाण शेंकडा १० टक्क्यांचे आंत येऊन बँकेला पहिला वर्ग मिळाला आहे. गेल्या वर्षीपेक्षां अहवालाचे सालीं बँकेकडील ठेवींत शेंकडा ३५ टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. दादर येथें बँकेनें ता. २२-८-३७ रोजीं शाखा उघडली असून तेथील कामाच्या प्रमाणांत समाधानकारक वाढ होत आहे. वर्षअखेर बँकेस मागील सालचा शिल्लक नफा धरून ११,१७० रु. ११ आ. ७ पै. नफा झाला, त्यांतून भागीदारांस ६ टक्के दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. बँकेची वार्षिक साधारण सभा ता. २५ सप्टेंबर रोजीं भरली होती.

### सटाणा तालुका (जि. नाशिक) को. सुपरवायझिंग यूनियन लि.

वरील यूनियनला सामील असलेल्या ब्राह्मणगांव सोसायटीचा रौप्य महोत्सव ता. १०।९।३८ रोजीं साजरा करण्यांत आला. पार्लमेंटरी सेक्रेटरी, श्री. हिरे वकील, हे अध्यक्षस्थानीं होते. स्वागताध्यक्ष, श्री. धर्माजी तानाजी पाटील, ह्यांनीं अभिनंदनपर संदेश वाचून दाखवून प्रास्ताविक भाषण केलें. सोसायटीच्या सेक्रेटरींनीं सोसायटीच्या प्रगतीचा अहवाल वाचून दाखवला. अध्यक्षांचे सूचनेवरून, अॅ. ऑर्गेनायझर श्री. साळुंके ह्यांनीं भाषण केलें. ते म्हणाले:—

"शेतकऱ्यांचे चाळणीस पुष्कळ भोकें आहेत व तीं बरीचशीं बंद करावयास पाहिजेत व अशा परिस्थितीमध्यें परमेश्वरानें जरी पुष्कळ दिलें तरी तें अपुरेंच पडेल. शेतकऱ्यानें आपला माल चांगल्या प्रकारानें पिकविला पाहिजे व तो माल सामुदायिक पद्धतीनें बाजारांत विकला पाहिजे. प्रत्येकानें काटकसरीनें वागणें आवश्यक आहे."

त्यानंतर, जळगांव डि. को. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. सोनवणे ह्यांनीं, "शेतकऱ्यांनीं संघशक्ति वाढविली पाहिजे" असा उपदेश केला. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले:—

"या तुमच्या सोसायटीमध्यें हल्लीं ६०-७० खातेदार मेंबर आहेत व गांवांत एकूण खातेदार १८०-१९० आहेत. तुमचेप्रमाणें त्यांना देखील कर्जाची जरूरी असेलच. तर त्यांना देखील मेंबर करून घेऊन सोसायटीची परिस्थिति चांगली करण्याचा प्रयत्न व्हावा. स्वतःचें भांडवल वाढविण्यासाठीं ठेवी व शेअर्स वाढवा म्हणजे कमी व्याजानें पैसा ओघानेंच तुम्हांला वापरण्यासाठीं मिळेल. आपण कोणतेंहि काम सहकाराचे सहाय्यानें करण्याची हौस ठेवली पाहिजे."

### सहकारी चळवळीसंबंधीं महात्मा गांधींचे विचार

"बाँबे को.क्वार्टर्ली"च्या सप्टेंबर १९३८ च्या अंकांत महात्मा गांधी ह्यांनीं मुंबई प्रांतिक सहकारी परिषदेस १९१७ सालीं सादर केलेला निबंध उद्धृत करण्यांत आला आहे. "सहकारी चळवळीचें उद्दिष्ट केवळ कर्जें स्वस्त आणि सुलभ करणें हें असतां कामा नये; सहकाराच्या खऱ्या तत्त्वानुसार, समाजाच्या सर्वांगीण उन्नतीस सहाय्यकारक होईल असें आपलें धोरण असलें पाहिजे," असा महात्माजींच्या म्हणण्याचा आशय आहे. वीस वर्षांपूर्वी त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांस आजच्या परिस्थितींत विशेष महत्त्व प्राप्त झालेलें आहे. महात्माजी म्हणतात:—"आर्थिक उन्नति झाली म्हणजे समाजाची संस्कृति सुधारते असें कित्येकास वाटतें. हिंदुस्थानाची अनेकांगी सुधारणा घडवून आणण्याचें सामर्थ्य असणारी सहकारी चळवळ निव्वळ कमी व्याजानें कर्ज देणारी एक संस्था बनून जातां कामा नये. ह्या चळवळीची प्रगति नवीन सोसायट्यांच्या संख्येनें मोजली न जातां सोसायट्यांच्या सभासदांच्या नैतिक प्रगतीनें मापली गेली पाहिजे. सभासदांस दिलेल्या कर्जांतील प्रत्येक पै कशी खर्चली जाते, ह्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. कर्जाचा विनियोग ताडी पिण्याकडे अगर जुगारीकडे होतां कामा नये. सावकाराच्या पिळवणुकीमुळें दारू अगर जुगार ह्या व्यसनांच्या आधीन होणें शेतकऱ्यांस अशक्य झालें, तर सोसायटीच्या कर्जाचा तसा विनियोग होण्यापेक्षां सावकारी पाशच पुरवला, असें मी म्हणेन."

## शेतीसुधारणा

—०⊙०—

### लोणीकंद येथील बाजरीच्या पिकांचे प्रयोग

हवेली तालुका को. ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट असोसिएशन पुणें या संस्थेमार्फत लोणीकंद, तालुका हवेली, येथें श्री. एस. एम. शिंदे पाटील यांच्या शेतांत गावरान बाजरी व साकुर्डी बाजरीचे प्रयोग प्लाट करण्यांत आले होते. शनिवार ता. ८-१०-१९३८ रोजीं दुपारीं ३ वाजतां बाजरीच्या उभ्या पिकांचें प्रात्यक्षिक श्री. व्ही. जी. गोखले एल. एजी., रिटायर्ड प्रिन्सिपॉल, शेतकी कॉलेज, पुणें यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलें. सभेस सुमारें १५० लोक हजर असून पेरणें, फुलगांव, वडूखुर्द, तुळापूर, वाघोली वगैरे जवळपासच्या गांवचे शेतकरीहि आले होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांपैकीं श्री. दळवी, रावसा. मगर, श्री. शितोळे व श्री. देवभानकर ऑन. सेक्रेटरीज, श्री. के. बी. भागवत वगैरे उपस्थित होते. सभेच्या पूर्वी सर्वांनीं पिकांची पहाणी केली; त्यांत साकुर्डी बाजरीचें पिक जरा बऱ्यापैकीं दिसलें. पावसानें बाजरीच्या कणसांतील दाण्याला कोंब फुटले होते व पिकाची बरीच खराबी झालेली दिसली. तेथें स्थानिक लोकांची एक कमिटी नेमण्यांत आली व कोणत्या प्लाटचें पीक जास्त आलें याबद्दल ती कमिटी प्रत्यक्ष धान्य मोजून आपला रिपोर्ट संस्थेकडे पाठविणार आहे.

सभेंत तेथील शाळेंतील विद्यार्थ्यांचें स्वागतपर पद्य व अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर संस्थेचे फिल्डमन रा. शिंदे यांनीं आजूबाजूच्या गांवांत शेतीसुधारणेबाबत काय प्रयत्न करण्यांत आले त्याविषयीं माहिती सांगितल्यानंतर ज्या ज्या शेतकऱ्यांनीं असोसिएशनच्या सल्ल्याप्रमाणें कार्य केलें त्यांचा या सुधारणांपासून कसा फायदा झाला, ज्वारी पेरण्यापूर्वीं गंधक लावण्यानें काणी रोग कसा अजिबात टळला वगैरे आपले अनुभव सांगितले. श्री. देवभानकर व श्री. शितोळे यांनीं संस्थेचे उद्देश व कार्य यांविषयीं माहिती सांगून शेती सुधारणेबाबत सर्व तऱ्हेची मदत संस्थेकडून केली जाते त्याचा जास्तींत जास्त फायदा करून घेण्याबद्दल विनंती केली. अध्यक्ष श्री. गोखले यांनीं शेती शास्त्रांत कसकशी सुधारणा होत चालली आहे, आपण या विषयांत किती अद्यापि मागसलेले आहोंत व या शास्त्रांत जी प्रगति होत आहे व जे प्रयोग शेतकी खात्याकडून व शेतकी तज्ज्ञांकडून सिद्ध झाले आहेत त्याबाबत प्रत्येक शेतकऱ्यानें त्या त्या सुधारणेचा उपयोग करून घेऊन आपली शेती सुधारणें किती आवश्यक आहे, याविषयीं सुसंगतवार माहिती सांगितली. सर्वच सुधारणा खर्चाच्या आहेत, असें नाहीं. ज्वारीच्या पिकाला कांहीं रोग होऊं नये याकरितां ज्वारी पेरण्यापूर्वीं गंधक लावण्याचा खर्च एकराला दीड पै सुद्धां येत नाहीं, मात्र तो जर आपण केला नाहीं तर नुकसान मात्र फार होतें. या व इतर बाबींचे तपशीलवार विवेचन त्यांनीं केलें. हवेली तालुका क्षेत्रांत शेती सुधारण्याचे प्रयत्न व त्याबाबत मार्गदर्शन करण्याचें कार्य करण्याकरितां आपल्याच संघशक्तीचें व सहकार्याचें मूर्तस्वरूप हवेली तालुका सहकारी शेतकी सुधारणा संघ आहे. त्याचा जरूर फायदा घ्यावा अशी त्यांनीं कळकळीची विनंति केली.

---

### लष्करी शिक्षणाच्या शाळा

शाळा-कॉलेजांतून लष्करी शिक्षण देण्याचा उपक्रम करण्याविषयीं मुंबई सरकारचा विचार चालू आहे. मुंबई प्रांतांत लष्करी शिक्षणाच्या सध्या दोन शाळा आहेत. त्यांपैकीं पुणें येथील श्री शिवाजी प्रेपरेटरी मिलिटरी स्कूलमध्यें ६८ विद्यार्थी असून नाशिक भोसले मिलिटरी स्कूलमध्यें १३३ विद्यार्थी आहेत.

### सनदी लोकांची भरती

इंडियन सिव्हिल सर्व्हिस करितां दिल्ली येथें घेण्यांत यावयाच्या परीक्षेस बसणारांपैकीं किमान पांच उमेदवारांची निवड केली जाईल. पांच जागा मुसलमानांसाठी राखून ठेवण्यांत येतील. एकादा मुसलमान परीक्षेंत यशस्वी झाला, तर राखीव जागा त्यामानानें कमी होतील.

### दक्षिण अमेरिकेंत तागाची लागवड

दक्षिण अमेरिका खंडांतील पॅरेग्वे देशांत तागाची लागवड मोठ्या प्रमाणावर होण्याचा संभव आहे. ब्राझीलमध्यें ताग लावण्यांत येत आहे. हिंदुस्थानास तागाचे बाबतींत प्रतिस्पर्धी निर्माण होऊं लागले आहेत.

### ग्रेटब्रिटनसाठी अमेरिकन विमानें

अमेरिकेमध्यें गेल्या वर्षी एकूण ३,१८७ विमानें तयार करण्यांत आलीं, त्यांपैकीं ६२९ विमानांची निर्गत झाली. ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्स ह्यांचेसाठी युद्धोपयोगी ५०० विमानें अमेरिकेनें नुकतीच तयार केलीं आहेत.

### रोखे बाजाराचे पगारी अध्यक्ष

मुंबई स्टॉक एक्सचेंजच्या अध्यक्षानें रोखे बाजारांत स्वतः व्यवहार करूं नये आणि ह्या नियंत्रणामुळें होणारें त्याचें नुकसान भरून काढण्यासाठी त्यास दरसाल ५० हजार रुपये मिळावेत, अशी व्यवस्था करण्यांत येणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रोखे बाजाराच्या अध्यक्षावरील वाढती जबाबदारी त्यास नीट पार पाडतां यावी, ह्याकरितां वरील प्रकारची तरतूद आवश्यक आहे, असें सुचविण्यांत आलें आहे. गेलीं पंधरा वर्षें श्री. के. आर. पी. श्रॉफ हे अध्यक्षस्थानीं आहेत, त्यांचीच वरील जागीं नेमणूक होईल, असें समजतें.

### क्षयरोगास बळी

गेल्या महायुद्धांत ब्रिटिश साम्राज्याचे १० लक्ष प्रजाजन मृत्युमुखीं पडले. एकट्या हिंदुस्थानांत त्याचे दुप्पट लोक क्षयरोगानें दरसाल मरण पावतात. महायुद्धसमाप्तीपासून आतांपर्यंत ह्या रोगानें २½ ते ३ कोटि हिंदी लोकांचा बळी घेतला आहे.

### इनकमटॅक्स बिलावरील सिलेक्ट कमिटी

इनकमटॅक्स बिलावरील सिलेक्ट कमिटीच्या बैठकीस दिल्ली येथें प्रारंभ झाला आहे.

---

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
**गेस्ट हाऊस**
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

### वापरलेल्या ( सेकंड हँड ) मोटारगाड्यांचा व्यापार

ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल ८० कोटि रुपयांच्या ३ लक्ष नवीन मोटारी खपतात. त्याचप्रमाणें ६५ कोटि रुपये किंमतीच्या ७ लक्ष वापरलेल्या मोटारगाड्यांची उलाढाल होते. ह्यावरून मोटारींच्या धंद्यामध्यें वापरलेल्या गाड्यांस किती महत्वाचें स्थान आहे, हें दिसून येईल. नवीन गाड्यांचा खप वापरलेल्या गाड्यांचे खपावर अवलंबून असतो. ग्रेट ब्रिटनमध्यें वापरांत असलेल्या मोटारगाड्यांची संख्या दरसाल दीड ते पावणेदोन लाखांनीं वाढत आहे. मोटारींस असलेली मागणी अशीच कायम राहिल्यास नव्या मोटारींस गिऱ्हाइक मिळत राहील, परंतु मागणी कमी झाल्यास वापरलेल्या गाड्यांच्या उठावाचें प्रमाण कायम राहून नव्या गाड्यांस कमी गिऱ्हाइक मिळेल. गिऱ्हाइकास नवीन मोटार विकते वेळीं त्याची जुनी मोटार योग्य मोबदला देऊन घेणें मोटारींच्या व्यापाऱ्यास भाग पडतें. ही वापरलेली गाडी विकून टाकावी लागते आणि त्या व्यवहारांत पुन: त्या गाडीपेक्षा अधिक जुनी गाडी मोबदल्याचा भाग म्हणून घ्यावी लागते. अशा रीतीनें हा व्यवहार कायम चालू रहातो. आठ ते दहा अश्व-शक्तीच्या वापरलेल्या मोटारगाड्यांस तात्काळ गिऱ्हाइक मिळूं शकतें, परंतु मोठ्या गाड्यांस तें मिळणें कठीण जातें. ह्यामुळें वापरलेल्या मोठ्या गाड्यांस, त्यांच्या मूळ किंमतीच्या मानानें, चांगली किंमत येत नाहीं. लोक आपल्या गाड्या किती जलद बदलतात, ह्यावर नवीन मोटारींचा खप अवलंबून रहातो आणि वापरलेल्या गाड्यांस किती किंमत येईल, ह्यावर लोकांचा जुनी गाडी देऊन नवीन गाडी घ्यावी किंवा नाहीं, हा विचार ठरतो. अमेरिकेमधील फोर्ड मोटार कंपनी मधून मधून जुन्या गाड्या विकत घेते आणि त्या मोडून टाकते. सिट्रॉन कंपनीनेंहि अशीच योजना आखली आहे. नुकतेंच, कांहीं महिन्यापूर्वीं, अमेरिकेंतील मोटारींच्या सर्व कंपन्यांनीं सहकार्य करून एका "वापरलेल्या गाड्यांच्या सप्ताहां"त अनेक जुन्या गाड्या खरेदी करून त्यांचा चक्काचूर करून टाकला. त्यामुळें तितक्या नवीन गाड्यांस वाव निर्माण झाला. वापरलेल्या गाड्यांच्या खरेदी-विक्रीचा प्रश्न हा मोटार कारखानदारांचे दृष्टीनें अत्यंत महत्वाचा आहे.

---

### कराड व पाटण तालुका को. सु. युनियन, लि.

वरील यूनियनला ३९ क्रेडिट व १ नॉनक्रेडिट अशा ४० सोसायट्या सामील आहेत. त्यांपैकी २ 'अ' वर्गांत, २६ 'ब' वर्गांत, ७ 'क' वर्गांत आणि ५ 'ड' वर्गांत आहेत. ह्या सर्व सोसायट्यांत मिळून २,४८४ सभासद असून, त्यांचें खेळतें भांडवल २¾ लक्ष रुपये आहे. एकूण येणें कर्ज २ लक्ष, ४८ हजार रुपये आहे, त्यापैकी शेकडा २८½ इतकी थकबाकी आहे. १९३६-३७ अखेरचें थकबाकीचें प्रमाण ३४% होतें. थकबाकीचें प्रमाण उतरलें हें नमूद करण्यासारखें आहे. एकूण सात सोसायट्यांचे ताब्यांत १,७३८ रुपये किंमतीच्या १० एकर, ५ गुंठे जमिनी आहेत. अहवालाचे वर्षांत एकाहि सोसायटीनें ताब्यांतील जमिनी विकल्या नाहींत. रिपोर्टाचे सालीं यूनियन क्षेत्रांत कराड येथें एक खरेदी-विक्री सोसायटी स्थापन झाली आहे, तिचे भाग घेऊन २१ सोसायट्या सभासद झाल्या आहेत. २५ सोसायट्यांच्या २२८ सभासदांनीं १९ हजार रुपये किंमतीचा माल ( शेंग, हळद व गूळ ) ह्या सोसायटीमार्फत विकला.

---

**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14

---

## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना— ७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,०५,५०,००० |

**मुख्य कचेरी**—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई

**शाखा**—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), वांद्रें ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ).

**लंडन एजन्ट्स**—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंटः— टी. आर. लालवाणी.

---

## संजीवन हेअर टॉनिक

**दारुणा, केंस गळणें व टक्कल**

**ह्यावर अनुभविक उपाय**

**संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद**

### गिरणी कामगारांस नफ्यामध्यें वाटा मिळणार

मदुरा मिल्स कंपनीनें, मार्गीदारांस मिळावयाच्या डिव्हिडंडानुसार आपल्या कामगारांस कंपनीच्या नफ्यामध्यें वांटणी करण्याचें योजिलें आहे. ही योजना खालीलप्रमाणें आहे:—

| मार्गीदारांस डिव्हिडंड | कामगारांस बोनस | बोनसची कमाल रक्कम |
|---|---|---|
| १०% | अर्ध्या महिन्याचा पगार | ५० रु. |
| १५% | एका महिन्याचा पगार | २०० रु. |
| २०% | दोन महिन्यांचा पगार | २०० रु. |

यत्या फेब्रुवारीमध्यें भागीदारांस दहा टक्के दरानें डिव्हिडंड देतां येतील अशी अपेक्षा आहे. टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनीनें कामगारांस नफ्यामध्यें वाटा देण्याची पद्धत हिंदुस्थानांत प्रथम सुरू केली; मदुरा मिल्स कंपनीचें हें दुसरें उदाहरण आहे.

### थेंबे थेंबे तळें साचें

सुप्रसिद्ध कोट्याधीश जॉन. डी. रॉकफेलर ह्यांच्यासंबंधीं एक गोष्ट नुकतीच एके ठिकाणीं प्रसिद्ध झाली आहे. आपल्या स्टँडर्ड ऑईल कंपनीचे कारखान्यास त्यांनीं नेहमीप्रमाणें भेट दिली असतां पेट्रोलचे डबे तेलानें भरून कसे झाळतात तें त्यांनीं एकदां निरखून पाहिलें आणि प्रत्येक डबा झाळण्यास ३९ थेंब शिसें लागतें असें त्यांस समजलें. जास्त काळजीपूर्वक डबे झाळले तर ३८ थेंबांत काम भागेल असें, त्यांनीं मुद्दाम प्रयोग करून पाहिले, तेव्हां त्यांस आढळून आले, ह्या एका थेंबाच्या बचतीची वार्षिक किंमत १½ लक्ष रुपये भरली!

### महत्त्वाच्या वाटाघाटींत दुभाष्याची आवश्यकता

ग्रेटब्रिटनचे मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन, हे हेर हिटलरशीं वाटाघाटी करण्यासाठीं जर्मनीस गेले, तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबर एक दुभाष्या घेतला होता. लॉर्ड बीकन्सफील्ड (डिझ्रेली) हे १८७८ सालीं रशिया-तुर्कस्तान लढाईनंतरच्या वाटाघाटींसाठीं बर्लिनला गेले, त्यावेळीं त्यांस फ्रेंच भाषेंत बोलण्यापासून मोठ्या खुबीनें परावृत्त करावें लागलें! लॉर्डसाहेबांना आपल्या "फ्रेंच"बद्दल अभिमान वाटत होता, परंतु त्यांचेबरोबर गेलेल्या परराष्ट्रीय खात्यांतील अधिकारी वर्गास लॉर्डसाहेबांचा अभिमान अस्थानीं असल्याची खात्री होती. त्यांनीं जर्मनींतील ब्रिटिश वकिलाचे कानांवर ही गोष्ट घातली आणि वकिलानें लॉर्डसाहेबांस युक्तीनें खुलवून त्यांचे मुखांतून शुद्ध इंग्रजी वदवलें. नाजुक बोलणीं करतांना दुभाष्याचा उपयोग न करणें एकास प्रतिष्ठेचें लक्षण वाटलें; दुसऱ्यानें प्रतिपक्षाच्या भाषेबद्दलचें अज्ञान प्रांजलपणें कबूल करून बरोबर दुभाष्या घेतला.

### आगपेट्यांचा खप

हिंदुस्थानांत दरसाल सुमारें १¾ कोटि ग्रोस आगपेट्या खपतात. जगांतील एकूण खपाचे मानानें हिंदुस्थानांतील हा उठाव एक नवमांशाइतका आहे.

### प. खा. जिल्हा को. इन्स्टिट्यूट, धुळें

वरील इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा धुळें येथें म्युनिसिपल हॉलमध्यें रविवार, ता. २३-१०-३८ रोजीं दुपारीं ३-३० वाजतां भरणार आहे.


## The Co-operators' Book Depot.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००
खपलेलें भांडवल २,४४,६०० वसूल झालेलें भांडवल १,२२,३००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

## जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें

गुरुवार, ता. १३ रोजीं सायंकाळीं मुंबई प्रांताच्या स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्रि, ना. एल. एम. पाटील, यांनीं जाधव टेलरिंग कॉलेजास भेट दिली.

संस्थेचे मॅनेजर, श्री. डी. ए. कुलकर्णी, यांनीं संस्थेचा अहवाल वाचून दाखवला आणि संस्थेच्या प्रगतीसंबंधीं त्यांनीं माहिती सांगितली. नंतर परिषदेंत उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांस सरकारी सर्टिफिकेटस व डिप्लोमा ना. पाटील यांचे हस्तें देण्यांत आले. ना. पाटील यांनीं विद्यार्थ्यांस उद्देशून उपदेशपर भाषण करतांना संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केल्यावर संस्थेचे प्रिन्सिपॉल श्री. जाधव यांनीं आभार मानले.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११७—० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२–१२ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८–१½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५–१२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९–१४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२२—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | २९–१४ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६०—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११३–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १००—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | १२२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२३–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | ११९—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६४—६ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३११—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | ११९०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६–१०–३ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–७–० |


पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ४चार आणे व्याजानें**

**व**

**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठी ८२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

**हेड ऑफिसः**-गिरगांव, मुंबई. **ब्रँचः**-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

**फर्म. कंपनी आणि सोसायटी**

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "**न्यायबोध**" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व ट.ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,

"**न्यायबोध**" मासिक, नागपूर शहर.




**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे याद्यीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )

२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

**व्ही. व्ही. ॲन्ड को०**

**जंपर स्पेशालिस्ट**

**लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,**

८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

अप–टु–डेट शिलाई करतां

# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणे — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**सुप्रसिद्ध संचालक मंडळ** व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

# दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

(हेड ऑफिस : जळगांव)

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

## सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी

यांचे **पेढे व बर्फी** वापरा

मोती चौक : : : सातारा

## K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

**'अभिनंदनीय प्रगति'** असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें